**आकाशवाणी नागपूर,**

**(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक ०४ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **अन्य राज्यातून बी.ए.एम.एस केलेल्या महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर आयुर्वेदिक शिक्षणासाठी राज्याच्या कोट्यातून प्रवेश देण्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय.**
2. **६८४ कोटी रुपयांच्या निधीतून नागपुरात अत्याधुनिक क्रीडा केंद्र साकारणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**
3. **आगामी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली इथं होणार; साहित्य महामंडळाच्या बैठकीत आज एकमताने निर्णय.**

**आणि**

4. **पॅरिस ऑलम्पिकमध्ये पुरुष हॉकी संघाची उपांत्य फेरीत धडक.**

****

बीएएमएस राज्य कोटा

अन्य राज्यातून बीएएमएस केलेल्या महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर आयुर्वेदिक शिक्षणासाठी राज्याच्या कोट्यातून प्रवेश देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. मुंबईत काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वैद्यकीय शिक्षण प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांना पदव्युत्तर प्रवेश नियमांत आवश्यक ते बदल करून मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. या विद्यार्थ्यांना आता राज्याच्या शासकीय आणि खाजगी अनुदानित ८५ टक्के तसंच खाजगी विना अनुदानित ७० टक्के कोट्यातून प्रवेश घेता येणार आहे.

मानकापूर क्रीडा केंद्र

नागपूरच्या क्रीडा क्षेत्राला चालना मिळावी, आंतरराष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू विदर्भातून घडावेत यासाठी जागतिक दर्जाच्या क्रीडासुविधा खेळाडूंना मिळाल्या पाहिजेत. यासाठी 684 कोटी रुपये निधी आपण उपलब्ध करून दिला असून नागपुरात जागतिक दर्जाचं क्रीडा विद्यापीठ आपण लवकर साकारू', असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं. मानकापूर परिसरातील क्रीडा केंद्राच्या बांधकामाच्या कोनशीलेचं अनावरण काल सायंकाळी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी होते. 'स्वप्नवत वाटेल असं हे केंद्र उभारलं जाणार असून नागपुरसाठी हा ऐतिहासिक दिवस असल्याचं' प्रतिपादन गडकरी यांनी यावेळी केलं.४५० बिछान्यांची होस्टेल सुविधा, अद्ययावत जिमनॅशियम सुविधा, प्रशासकीय इमारत, कॅफेटेरीया, आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रीडा साहित्य, रेनवॉटर हारवेस्टिंग, आदी सुविधा या क्रीडा संकुलात निर्माण करण्यात येणार आहेत. पुढील 3 वर्षात हे केंद्र खेळाडूंसाठी उपलब्ध करुन दिलं जाईल.

राष्ट्रवादी ‘जनसन्मान’ यात्रा

महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजना आणि सरकारचं कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस तर्फे राज्यात ‘जनसन्मान’ यात्रा काढण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार या यात्रेच्या निमित्तानं सर्व जिल्ह्यांचा दौरा करणार आहेत. यात्रेसाठी सात समन्वयकांची तर आठ सहसमन्वयकांची यादी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी जाहीर केली आहे.

एसटीसंगे तीर्थाटन

राज्यातील एसटी महामंडळाच्या विविध आगारांच्या माध्यमातून श्रावण महिन्यानिमित्त तीर्थक्षेत्री जाण्यासाठी ‘श्रावणात एसटी संगे तीर्थाटन’ हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येत आहे. या माध्यमातून ज्येष्ठ

नागरिक, महिला यांना मोफत आणि माफक दरात तीर्थाटनाचा आनंद घेता येणार असून प्रवाशांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असं आवाहन महामंडळाच्या वतीनं करण्यात आलं आहे. सवलतीमुळे माफक दरात तीर्थाटन करण्याचा आनंद सामान्यांना मिळतानाच एसटीच्या प्रवासी संख्येत वाढ होण्यास मदत होणार आहे.

गडकरी जनसंपर्क

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला आज नागपूरकरांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. नागपूर महानगरपालिकेत आयोजित जनसंपर्क कार्यक्रमात गडकरी यांनी नागरिकांची विधानसभानिहाय निवेदने स्वीकारली. झोननिहाय तत्काळ नियोजन करून नागरी समस्या सोडविण्याचे निर्देश यावेळी गडकरी यांनी मनपाच्या अधिकाऱ्यांना दिले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मानेवाडा चौक, म्हाळगीनगर येथील उड्डाणपुलामुळे नागरिकांना मोठी सुविधा होणार आहे. उड्डाणपुलामुळे रिंगरोड आता अधिक परिपूर्ण होईल. तसंच नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते म्हाळगीनगर चौक आणि मानेवाडा चौक उड्डाणपुल बांधकामाच्या भूमिपूजन समारंभाचं काल सायंकाळी आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी फडणवीस बोलत होते. नागपुरातील सामान्य जनतेच्या आरोग्यासाठी सुमारे ६०० कोटी रुपये निधी दिला असून, यातून वैद्यकीय महाविद्यालयात अत्याधुनिक सुविधा आपण नव्यानं उपलब्ध करून देत असल्याचंही उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली इथं होणार आहे. मुंबईत आज पार पडलेल्या साहित्य महामंडळाच्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला. 98 व्या साहित्य संमेलनासाठी एकूण सात संस्थांनी निमंत्रणे दिली होती. त्यापैकी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, च्या शाखेचे इचलकरंजी, नॅशनल लायब्ररी मुंबई, आणि सरहद संस्थेच्या दिल्ली येथील जागांना महामंडळाच्या स्थळ निवड समितीनं भेट दिली. संमेलनासाठी जागा, निवास व्यवस्था, संस्थेचं मनुष्यबळ, पुस्तक प्रदर्शनाची जागा आदी मुद्द्यांचा विचार करून दिल्ली येथील सरहद संस्थेची 98 व्या मराठी साहित्य संमेलनासाठी निवड करण्यात आली आहे.

शोभना रानडे

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. त्या १०० वर्षांच्या होत्या. शोभना रानडे यांनी निराधार महिला आणि मुलांसाठी समाजकार्य केलं. भारत सरकारनं २०११ मध्ये त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं. गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या माध्यमातून गंगा वाचवा मोहिमेमध्ये शोभना रानडे यांचा सक्रिय सहभाग होता.

भारत विरुद्ध श्रीलंका

भारत विरुद्ध श्रीलंकेत सुरू असलेल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना कोलंबो इथल्या आर. प्रेमदासा मैदानावर होत आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. मालिकेतला पहिला सामना बरोबरीत सुटला होता. शेवटची माहिती हाती आली तेव्हा श्रीलंकेने 48 षटकांत 07 गडी गमावून 232 धावा केल्या आहेत.

ऑलिम्पिक

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या हॉकी संघाने आज ग्रेट ब्रिटनला उपांत्यपूर्व फेरीत हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. पूर्ण वेळेत १-१ अशा बरोबरीनंतर पेनल्टी शूट आऊट मध्ये इंग्लंडला ४-२ असं नमवून, भारतानं हा विजय मिळवला. उपांत्य सामन्यात भारताचा सामना जर्मनी किंवा अर्जेंटीनाशी होईल. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज बॅडमिंटनच्या उपांत्य फेरीत भारताचा लक्ष्य सेन टोक्यो ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता डेन्मार्कचा व्हिक्टर अॅक्सेलसन यांच्याकडून २२-२०, २१-१४ अशा सरळ सेटमध्ये पराभूत झाला. लक्ष्य सेन उद्या कांस्य पदकासाठी खेळेल. तर दुसरीकडे महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ७५ किलो वजनी गटात भारताची मुष्टियोद्धा लोव्हलीना चीनच्या ली क्वियान कडून ४-१ ने पराभूत झाली.

हवामान

हवामान-मुंबईसह राज्यभरात आज पावसाचा जोर असून अनेक ठिकाणी धरणांमधला विसर्ग वाढवल्यामुळे नद्यांकाठच्या गावांना प्रशासनानं सावधानतेचा इशारा दिला आहे. उद्यापर्यंत पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यातल्या अनेक नद्यांच्या पाणी पातळीत झालेली वाढ आणि त्यामुळे या नद्यांवरच्या धरणांमधून वाढवलेल्या पाण्याच्या विसर्गाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांमधल्या पूरपरिस्थितीचा आज आढावा घेतला. तर जिल्ह्यातल्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आणि नदीकाठच्या सखल भागांमधल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. दरम्यान विदर्भात आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह

वादळ, सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर उद्या वर्धा, अकोला, अमरावती, आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी पावसाचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला असून परवा संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटांसह वादळाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

भाजप जिल्हा अधिवेशन

आज सावनेर इथं भाजपचं नागपूर जिल्हा एक दिवसीय महा अधिवेशन आयोजित करण्यात आलं होतं. या अधिवेशनाचं कामकाज १ वाजता सुरु झालं असून आज सायंकाळी ७ पर्यंत ते सुरु राहणार आहे. कृषी, राजकारण, भ्रष्टाचार विरोध यांसह अनेक प्रस्ताव या अधिवेशनात मांडण्यात आले.

मैत्री दिवस

आज मैत्री दिन सर्वत्र साजरा होत आहे. गोंदिया येथील यारो की यारी मैत्री ग्रुप द्वारा अनोख्या पद्धतीने मित्रता दिवस साजरा करत आज पाचशे वृक्षांचं रोपण करण्यात आलं तसेच मैत्री दिनानिमित्त पर्यावरण संरक्षणाची शपथ घेण्यात आली.

******